राष्ट्रीयकृत बँकांसोबत रु.१६,०००/- कोटी पेक्षा जास्त नक्त मूल्य असणाऱ्या खाजगी बँका (अनुसूचित वाणिज्यिक बँका) आणि नक्त मूल्य रु.४,०००/- कोटी पेक्षा जास्त असल्यास महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, मुंबई या बँकांना शासकीय कार्यालयांच्या बँकींग विषयक व्यवहारांसाठी आणि सार्वजनिक उपक्रम / महामंडळे यांचेकडील अतिरिक्त निधी गुंतवणूकीसाठी पात्र ठरविण्यास मान्यता देण्याबाबत....

**महाराष्ट्र शासन**

**वित्त विभाग**

**शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण २०२२/प्र.क्र.१२३/२२/कोषा-प्रशा५**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

तारीख: २२ नोव्हेंबर, २०२३

**वाचा :** १. वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक: शासाउ - १०.१५/ प्र.क्र.४२/ सा.उ., दि.२७ ऑक्टोबर, २०१५.

२. वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण २०२०/ प्र.क्र.५१/२०/ कोषा-प्रशा ५, दि.१३ मार्च, २०२०.

३. वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण २०२०/ प्र.क्र.५१/ २०/कोषा-प्रशा ५, दि.१३ ऑगस्ट २०२०.

४. वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण २०२०/प्र.क्र.५१/२०/कोषा-प्रशा५ , दि. ३ मार्च, २०२१ आणि शासन निर्णय समक्रमांक दि. २० मे,२०२१; दि.९ डिसेंबर, २०२१; व दि.७ डिसेंबर २०२२.

५.वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण २०२०/प्र.क्र.८४/कोषा-प्रशा५ , दि. १५ सप्टेंबर,२०२१ आणि शासन निर्णय समक्रमांक दि. ७ ऑक्टोबर,२०२१.

**प्रस्तावना :**

i. उपरोक्त **'वाचा'** मधील अनुक्रमांक १ समोर नमूद शासन निर्णयान्वये शेड्यूल्ड बँकांपैकी स्टेट बँक व तिच्या असोसिएट बँका, राष्ट्रीयकृत बँका व किमान रु.४,०००/- कोटी नक्त मूल्य (Net Worth) असणाऱ्या बँकांमध्ये राज्य सार्वजनिक उपक्रमांचा अतिरिक्त निधी गुंतविण्यास मान्यता देण्यात आली होती.

ii. तसेच उपरोक्त **'वाचा'** मधील अनुक्रमांक २ समोर नमूद शासन निर्णयान्वये सर्व शासकीय कार्यालये, सार्वजनिक उपक्रम व महामंडळे इत्यादींनी त्यांचे सर्व बँकिंग विषयक व्यवहार केवळ राष्ट्रीयकृत बँकांमार्फतच करण्याचे धोरण घोषित करण्यात आले होते. सदर धोरणानुसार सार्वजनिक उपक्रम /महामंडळ यांचेकडील अतिरिक्त निधीच्या गुंतवणूकीसाठी केवळ राष्ट्रीयकृत बँकांनाच पात्र ठरविण्यात आले आहे.

iii. या शिवाय आयडीबीआय (IDBI) या बँकेचे ९७.४६% भागभांडवल प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरित्या भारत सरकारच्या मालकीचे असल्याच्या कारणास्तव उपरोक्त **'वाचा'** मधील अनुक्रमांक ३ समोर नमूद शासन निर्णयान्वये आयडीबीआय (IDBI) बँकेला सार्वजनिक उपक्रम / महामंडळे यांचेकडील अतिरिक्त निधी गुंतविण्यासाठी पात्र ठरविण्यात आले आहे. तसेच उपरोक्त **'वाचा'** मधील अनुक्रमांक ४ समोर नमूद विविध चार शासन निर्णयांन्वये खाजगी बँकांना (अनुसूचित वाणिज्यिक बँकांना) मर्यादीत प्रमाणात शासकीय बँकिंग व्यवहार हाताळण्याची परवानगी देण्यात आली आहे.

iv. त्याचप्रमाणे उपरोक्त **'वाचा'** मधील अनुक्रमांक ५ समोर नमूद दोन शासन निर्णयांन्वये स्टेट बँक ऑफ इंडिया किंवा इतर कोणतीही राष्ट्रीयकृत बँक व ICICI बँक आणि HDFC बँक या बँकांमध्ये केंद्र पुरस्कृत योजनांसाठीचे Single Nodal Agency चे Single Nodal Bank Account उघडण्यासाठी मान्यता देण्यात आलेली आहे.

v. दरम्यानच्या काळात केंद्र सरकारकडून शासकीय बँकिंगविषयक व्यवहारांसाठी राष्ट्रीयकृत बँकांच्या सोबत खाजगी क्षेत्रातील बँकांचा देखील विचार करणेबाबत निर्देश निर्गमित करण्यात आलेले आहेत. तसेच शासकीय कार्यालयांच्या बँकिंगविषयक व्यवहारांसाठी आणि सार्वजनिक उपक्रम / महामंडळ यांच्या बँकिंगविषयक व्यवहारांसाठी व त्यांच्याकडील अतिरिक्त निधीच्या गुंतवणुकीसाठी राष्ट्रीयकृत बँकांसोबतच खाजगी बँकांचा (अनुसूचित वाणिज्यिक बँकाचा)देखील विचार केल्यास बँकिंग क्षेत्रातील स्पर्धेचा लाभ होऊन कार्यक्षम व परिणामकारक सेवा शासकीय कार्यालयांना व सार्वजनिक उपक्रमांना आणि तत्सम संस्थांना उपलब्ध होऊ शकतील.

vi. या पार्श्वभूमीवर शासकीय कार्यालयांच्या बँकिंगविषयक व्यवहारांसाठी आणि सार्वजनिक उपक्रम / महामंडळ यांच्या बँकिंगविषयक व्यवहारांसाठी व त्यांच्याकडील अतिरिक्त निधीच्या गुंतवणुकीसाठी राष्ट्रीयकृत बँकांसोबतच खाजगी बँकांचा (अनुसूचित वाणिज्यिक बँकाचा) आणि महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, मुंबई यांना पात्र ठरविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय :

(१) उक्त प्रस्तावनेमध्ये नमूद वस्तूस्थितीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रीयकृत बँकांच्या सोबतच रु.१६,०००/- कोटीपेक्षा जास्त नक्त मूल्य असणाऱ्या खाजगी बँकांनासुध्दा (अनुसूचित वाणिज्यिक बँकांनासुध्दा) (अ) सतत ५ वर्षे निव्वळ नफा मिळविलेला असणे, (ब) भांडवल पर्याप्तता गुणोत्तर (Capital Adequacy Ratio) १२ % पेक्षा जास्त असणे, (क) बँकेवर भारतीय रिझर्व्ह बँकेद्वारा कोणतेही आर्थिक निर्बंध तसेच (ड) त्वरीत सुधारात्मक कार्यवाही (Prompt Corrective Action) लादलेली नसणे, या सर्व निकषांची पूर्तता करण्याच्या अटीवर शासकीय कार्यालयांच्या बँकींग विषयक व्यवहारांसाठी आणि सार्वजनिक उपक्रम / महामंडळे यांचेकडील अतिरिक्त निधी गुंतवणूकीसाठी पात्र ठरविण्यास मान्यता देण्यात येत आहे. वित्तीय वर्ष २०२२-२०२३ च्या ताळेबंद पत्रकानुसार रु.१६,०००/- कोटी पेक्षा जास्त नक्त मूल्य असणाऱ्या खाजगी बँकाची (अनुसूचित वाणिज्यिक बँकांची) सूची या शासन निर्णयासोबतच्या **जोडपत्र 'अ'** मध्ये दर्शविण्यात येत आहे.

(२) तसेच नक्त मूल्य रु.४,०००/- कोटी पेक्षा जास्त असणे, (अ) सतत ५ वर्षे निव्वळ नफा मिळविलेला असणे व लेखापरीक्षेमध्ये सतत ५ वर्षे 'अ' वर्ग दर्जा प्राप्त केलेला असणे, (ब) भांडवल पर्याप्तता गुणोत्तर (Capital Adequacy Ratio) १२% पेक्षा जास्त असणे, (क) बँकेवर भारतीय रिझर्व्ह बँकेद्वारा कोणतेही आर्थिक निर्बंध तसेच (ड) त्वरीत सुधारात्मक कार्यवाही (Prompt Corrective Action)

लादलेली नसणे, या सर्व निकषांची पूर्तता करीत असल्यास, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, मुंबई या बँकेस शासकीय कार्यालयांच्या बँकींग विषयक व्यवहारांसाठी आणि सार्वजनिक उपक्रम / महामंडळे यांचेकडील अतिरिक्त निधी गुंतवणूकीसाठी पात्र ठरविण्यास मान्यता देण्यात येत आहे. वित्तीय वर्ष २०२२-२०२३ च्या ताळेबंद पत्रकानुसार महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, मुंबई या बँकेचे नक्त मूल्य रु.४,०८६.६६ कोटी इतके आहे. सबब महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, मुंबई या बँकेचा समावेश या शासन निर्णयासोबतच्या जोडपत्र - अ मध्ये करण्यात येत आहे.

(३) क्षेत्रिय स्तरावर बँकींग विषयक व्यवहारांच्यासंदर्भात या शासन निर्णयासोबतच्या **जोडपत्र 'अ'** मध्ये दर्शविलेल्या बँकांमधून एका बँकेची निवड करताना संबंधित सक्षम प्राधिकाऱ्यांनी उपरोल्लेखित सर्व निकषांची पूर्तता होत असल्याची खात्री करुनच जाणीवपूर्वक निर्णय घ्यावा. प्रस्तुत शासन निर्णय निर्गमित झाल्यानंतर दरम्यानच्या कालावधीमध्ये सद्यस्थितीत उपरोल्लेखित किमान नक्त मूल्याच्या निकषावर पात्र ठरलेल्या या शासन निर्णयासोबतच्या **जोडपत्र 'अ'** मध्ये दर्शविलेल्या बँकांपैकी एखादया बँकेचे नक्त मूल्य उपरोल्लेखित किमान विहित मर्यादेपेक्षा कमी होणे आणि / किंवा उपरोल्लेखित (अ) ते (ड) यापैकी एक किंवा अनेक निकषांची पूर्तता न होणे अशी परिस्थिती उदभवण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा परिस्थितीमध्ये सदर वस्तुस्थिती संबंधित बँकेने तात्काळ शासनाच्या निदर्शनास आणून देणे अनिवार्य राहील.

(४) सदर शासन निर्णयातील तरतूदी नागरी स्थानिक स्वराज्य संस्था आणि पंचायती राज संस्था यांना लागू करणेबाबत अनुक्रमे नगर विकास विभाग आणि ग्राम विकास विभाग यांनी त्यांच्या स्तरावर स्वतंत्रपणे निर्णय घ्यावा.

(५) उपरोक्त **'वाचा'** मधील अनुक्रमांक १ समोर नमूद दि.२७ ऑक्टोबर, २०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्य सार्वजनिक उपक्रमांच्या अतिरिक्त निधीच्या गुंतवणूकीसंदर्भात मार्गदर्शक तत्वे / सूचना विहित करण्यात आलेल्या आहेत. दि.२७ ऑक्टोबर, २०१५ रोजीच्या उपरोल्लेखित शासन निर्णयातील परिच्छेद क्र. (क) मधील अ.क्र. (i) मधील नक्त मूल्याविषयीची तरतूद वगळता, अन्य सर्व मार्गदर्शक तत्वे / सूचना अबाधित ठेवण्यात येत असून, त्यांचे काटेकार अनुपालन करणे सर्व संबंधितांसाठी आवश्यक राहील.

प्रस्तुत शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक २०२३११२२१८४२४५६१०५ असा आहे. प्रस्तुत शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RUPALI KASHINATH SAWANT

Digitally signed by RUPALI KASHINATH SAWANT
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FINANCE DEPARTMENT, 2.5.4.20=6c3a3903792b1204545e0d84bef8ba7fe114691fdf973fd9e12aa8c0b4498cab, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=97D8A8764FAC512B66CDC7CFC119E8EEE2E6B9474FAA85F5BDB3DBD4D88C763E, cn=RUPALI KASHINATH SAWANT
Date: 2023.11.22 18:54:34 +05'30'

**( रुपाली सावंत )**
**अवर सचिव,महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,
३. मा.उप मुख्यमंत्री (गृह) यांचे सचिव,

४. मा. उप मुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे सचिव,
५. सर्व मा.मंत्री व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
६. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा / विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई.
७. सर्व सन्माननीय विधानसभा / विधान परिषद व संसद सदस्य. सर्व मंत्रालयीन
८. प्रशासकीय विभाग,
९. मंत्रालयीन सर्व विभागांच्या अधिनस्त असलेल्या सर्व विभागांचे व कार्यालयांचे प्रमुख,
१०. प्रबंधक, मूळ न्यायालय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई
११. प्रधान महालेखापाल (लेखा परीक्षा)- १, महाराष्ट्र, मुंबई
१२. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई
१३. महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर
१४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर
१५. आयुक्त, आयकर (TDS) चर्नीरोड, मुंबई ४००००२
१६. आयुक्त, आयकर (TDS) सिव्हील लाईन*, नागपूर ४४४००१
१७. प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा) मुंबई
१८.सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१९.सचिव, महाराष्ट्र विधीमंडळ सचिवालय, मुंबई
२०.प्रबंधक, लोक आयुक्त व उपलोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
२१.प्रबंधक,महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण,मुंबई,
२२.मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
२३.विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली,
२४.सर्व विभागीय आयुक्त, सर्व जिल्हाधिकारी,
२५.सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
२६.संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई,
२७.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
२८.प्रादेशिक सह संचालक,लेखा व कोषागारे,कोकण/पुणे/ नाशिक/छत्रपती संभाजीनगर/ अमरावती/नागपूर
२९.संचालक,स्थानिक निधी लेखापरिक्षा संचालनालय, नवी मुंबई,
३०.प्रादेशिक सह संचालक,स्थानिक निधी लेखापरीक्षा कोकण/पुणे/नाशिक/ छत्रपती संभाजीनगर/ अमरावती/ नागपूर,
३१.वरिष्ठ जिल्हा कोषागार अधिकारी, ठाणे / पुणे / नाशिक / छत्रपती संभाजी नगर / अमरावती/ नागपूर
३२.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
३३.वित्त विभागातील सर्व कार्यासने,
३४.निवड नस्ती कोषा प्र.५

शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण २०२२/प्र.क्र.१२३/२२/कोषा-प्रशा५ सोबतचे जोडपत्र

जोडपत्र 'अ'

किमान विहित नक्त मूल्य धारण करणाऱ्या बँकांची सूची

* अनुसूचित वाणिज्यिक बँका *

| अनुक्रमांक | बँकेचे नांव |
|---|---|
| १ | एचडीएफसी बँक (HDFC Bank) |
| २ | आयसीआयसीआय बॅक (ICICI Bank) |
| ३ | एक्सीस बॅक (Axis Bank) |
| ४ | कोटक महेंन्द्रा बँक (Kotak Mahendra Bank) |
| ५ | इंडसइंड बँक (INDUSIND Bank) |
| ६ | येस बँक (YES Bank) |
| ७ | आयडीएफसी फर्स्ट बँक (IDFC First Bank) |
| ८ | फेडरल बँक (FEDERAL Bank) |
| ९ | बंधन बँक (BANDHAN Bank) |

****** ******

* सहकारी बँक *

| अनुक्रमांक | बँकेचे नांव |
|---|---|
| १ | महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, मुंबई. |



Source: Government of Maharashtra Official Website